# किमया की माया?

**<u>अस्वीकृती:</u>** या लेखामधे समाविष्ट असलेली माहिती केवळ सर्वसाधारण माहिती हेतूसाठी आणि विचारचालनेसाठी आहे. या लेखामधील व्यक्त केलेली मते, वर्णन, दृष्टीकोन, विचार, चित्रण, चरित्रण इ. हे पूर्णत: लेखकाचे आहेत. लेखामधे वापरलेल्या सर्व व्यक्ती काल्पनिक आहेत. पण अनुभव सत्य परिस्थितीवर आधारीत आहेत.

***"फेसबुक व फेसबुकच्या बिझिनेस प्रति सर्व देय आदराने मी हा लेख लिहित आहे."***

***"With due respect to Facebook and its business"***

मागील महिन्यात माझ्या शाळेतील मैत्रीण रिया भेटायला घरी आली होती. शाळेतील मैत्रीण म्हटले तर गप्पा कशा रंगतात तशा आमच्या  गप्पाही रंगल्या होत्या. पण त्यामधे रिया कुठेतरी निराश देखील जाणवत होती. थोड्या वेळानी रिया म्हणाली, "दीप्ती, सगळ्यांचे आयुष्य कसे eventful दिसते. माझ्या आयुष्यात काही happening नाही असे वाटते."

रिया भावनेच्या ओघात सांगत होती. आणि मी शांतपणे ऐकत होते. ती म्हणाली, "फेसबुकवर नवरा बायकोला वाढदिवसाच्या शुभेच्छा देतो. दर काही दिवसांनी फेसबुकवर प्रेम व्यक्त करतो. बायको देखील प्रेमाने नवऱ्याचे कौतुक करीत पोस्ट टाकते. आणि सांगते की वाढदिवसाला भेट दिलेल्या डायमंड नेकलेससाठी 'Thank You my sweetheart'.

मग नंतर त्या डायमंड नेकलेसची आणि प्रेमळ नवऱ्याची चर्चा एका पार्टीत होते. जे लोक नवरा/बायकोच्या फ्रेंडलिस्टवर असतात त्यांना वाढदिवसाला भेट दिलेल्या त्या डायमंड नेकलेस विषयी माहिती असते. बाकीचे आपण यामधे अनोळखी असल्यासारखे ऐकत असतात."

आपले आयुष्य boring आहे असे रियाला वाटत होते. कारण तिच्याकडे फेसबुकच्या जगामधे शेअर करायला काही उत्कंठापूर्ण गोष्ट नव्हती असे तिला वाटत होते. आपण काय खातो, काय पीतो, कुठे फिरायला जातो, काय वाचतो, काय करतो या गोष्टी तर त्याच आहेत ज्या फेसबुकच्या आगमनाआधी होत्या. मग बदलले तरी काय?

मला रियाची समस्या लक्षात आली होती. मी रियाला थांबविले आणि विचारले, "सगळ्यांचे आयुष्य कसे eventful "दिसते"? दिसते म्हणजे जे आपण बघतो ते. म्हणजेच जे आपल्याला दाखविले जाते ते. त्यावर किती विश्वास ठेवायचा, किती मनाला एखादी गोष्ट लावायची, किती बघून सोडून द्यायचे आणि कसे आपले आयुष्य खरोखरच घटनापूर्ण बनवायचे हे आपल्या हातात नाही का? "

फेसबुकमुळे सार्वजनिक अभिव्यक्ती वाढली आहे. नवरा-बायको जे दररोज बरोबर राहतात ते पण फेसबुकवर प्रेम व्यक्त करतात. यात चूक-बरोबरचा प्रश्न नाही. कुठलाही बदल थोडा अवघड असतो  पण change is the only constant in life. या virtual reality मधे आपल्या संक्रमणाला पण वेळ लागणारच. पण व्यक्तिगत आणि सार्वजनिक गोष्टी कुठल्या यात अंतर करणे गरजेचे आहे.

आई-वडील आपल्या मुलांवर आपण किती प्रेम करतो हे फेसबुकवर पोस्ट करत असतात. आजच्या काळाची खरच ही गरज आहे का हे मलाही माहिती नाही. पण यानी मुलांच्या आयुष्यात आई-वडिलांविषयी आदर वाढत असेल किंवा मुलांचा आत्मविश्वास वाढत असेल किंवा आई-वडिलानाच सार्वजनिक अभिव्यक्तीमुळे समाधान वाटत असेल तर चूक-बरोबर काय सांगायचे? फेसबुकवर आता "Dislike" बटण येणार आहे. प्रत्येक छोट्या छोट्या गोष्टींवर आपल्याला मताची गरज खरच आहे का? त्याच "Dislike" मुळे तर आई-वडिल ही पोस्ट टाकत नसतील ना? खरच एक एक छोटी पोस्ट आयुष्यात लाइक/डिसलाइक वाढवित असेल का?


जवळच्या लोकांनी लाइक नाही केले तर खरच पोस्ट आवडली नसेल किंवा आपल्याकडे दुर्लक्ष केले असे वाटू शकते. पण आपण चांगला सकारात्मक विचार करुयात. म्हणजे पोस्ट पाहिलीच नसेल हे उत्तम आणि आपल्या मनाला बरे वाटेल असे. पण एखादी जवळची व्यक्ती आपल्याला कधीच लाइक करत नसेल पण बाकी अन्य पोस्टना लाइक करत असेल तर स्वत: समजून घ्यावे काय ते आणि म्हणून पुढे जाणे योग्य. "मूव्ह ऑन".  शाहरुख खानने वीस वर्षांपूर्वी दूरदृष्टिने त्याच्या सुपरहिट

चित्रपट DDLJ मधे आपणास सांगितले होते - "बडे बडे देशो मे ऐसी छोटी छोटी बाते होती रहती है." छान अर्थपूर्ण संदेश होता तो.

फेसबुकचा वापर आता क्राइम करायला पण होऊ लागला आहे. एकाने पोस्ट टाकली "Vacationing in Europe for a week" आणि आल्यावर त्याच्या घरी चोरी झाल्याचे आढळले. त्यामुळे कुठे काय शेअर करायचे ते जपूनच करणे योग्य. आता पोलिस देखील क्राइमचा तपास करायला फेसबुकचा वापर करायला लागले आहेत.

आजकाल कित्येक आई-वडील आपली मुले फेसबुकवर कशी वागतात यावर लक्ष ठेवण्यास अकाउन्ट काढतात. त्यात काही चुकीचे नाही. कारण आजकाल टीनेजर्समधे सायबर बुलिंग प्रकार खूप वाढला आहे आणि त्यामुळे मुलांच्या वागणूकीवर लक्ष ठेवणे अथवा त्यांच्याशी इतरांची वागणूक कशी आहे हे समजणे काळाची गरज झाली आहे.

एखादा मुलगा शाळेत एकदम शांत असतो पण फेसबुकवर प्रचंड फ्रेंडस. सगळ्या गप्पा फक्त फेसबुकवर. फेसबुकवरचा हा 'फेस' फेक तर नाही ना? या virtual विश्वामुळे होणारे मानसिक आजारांच्या उपचारांसाठी दवाखाने निघाले आहेत. जग नक्कीच जवळ आले पण तरीही सर्व छोटे छोटे आनंद लोप पावले नाहीत ना?




सर्व गोष्टी कशा फेसबुक मधे शेअर होतील याची दखल घेतली जाते पण आरामात बसून गप्पा होतील की नाही याची खात्री आहे का? आनंदाची एखादी बातमी जी फोनवर सांगितली जायची ती फेसबुकवर आधी येते खरोखरच एका बातमी सारखी. त्यामुळे त्याचे अभिनंदन पण फेसबुकवरच होते. जे कौतुक आणि जी शाब्बासकी प्रेमाने आणि हक्काने पाठीवर दिली जायची ती टेक्स्ट मेसेज करुन किंवा फेसबुकवर "थम्स अप"/"क्लॅप" च्या ग्राफिक चिन्हाने होते. याला खरच प्रगती म्हणायची का? जो वेळ कट्ट्यावर मस्त गप्पा मारण्यात घालविला जायचा तो फेसबुकच्या ग्रुपवर दिला जातो. यात सध्या

whatsapp चा क्रमांक पुढे आहे. बिल्डींगचा ग्रुप, मित्र-मैत्रिणी यांचा ग्रुप, त्यात देखील अधिक जवळच्या मित्र-मैत्रिणी यांचा सब-ग्रुप, पॉटलक ग्रुप, कारपूल ग्रुप, क्म्युनिटि ग्रुप, त्यात देसी ग्रुप, मग त्यात मराठी ग्रुप, मग मराठी मधे मुंबईचा/पुण्याचा ग्रुप ई..... अँड दिस लिस्ट गोझ ऑन!

लहानपणी कट्टी-बट्टीचे रुसवे-फुगवे आता फेसबुकवरचे फ्रेंड-अनफ्रेंड करणे झाले आहे. कट्टी-बट्टीचे रुसवे-फुगवे तशे लवकर संपायचे. पण अनफ्रेंड करुन फ्रेंड लवकर होताना दिसत नाही. कट्टी-बट्टीत कसा एक वैयक्तिक भाव असायचा, तो आता फ्रेंड-अनफ्रेंड मधे खरच राहिला आहे का?

फेसबुकने जेवढे आपले जीवन या मायेत गुंतविले तेवढीच त्याची किमया महान. फेसबुकचा वापर आपण कसा करायचा हे पुर्णत: आपल्या हातात आहे. मी स्वत: आज माझ्या चित्रकला प्रदर्शना विषयी माहिती आणि आमंत्रण फेसबुकच्या सोशल माध्यमातून देते. ज्या लोकांचे पत्ते आपल्याकडे नसायचे त्यांचे फेसबुकचे प्रोफाईल सापडले की झाले. तेवढेच कशाला? ज्या ग्रुपच्या विषयी आपण मगाशी बोललो त्या ग्रुप्सना देखील आपण आमंत्रण देऊ शकतो. आपल्याला या ग्रुप्समुळे आपल्या आसपासच्या परिसरातीलच नव्हे तर अगदी जगातील सर्व कार्यक्रमांची माहिती मिळू शकते. कुठल्या संकेतस्थळावर न जाता एकाच ठिकाणी ते म्हणजे फेसबुकवर!

प्रेसीडेंट श्री. बराक ओबामा जी असो किंवा पंतप्रधान श्री. नरेन्द्र मोदी जी असो आज आपण त्यांच्या प्रत्येक निर्णयाविषयी आपले मत लगेच सोशल माध्यमातून कळवू शकतो. किंबहुना या अति मोकळेपणानी कुठे आदराची भावना तर कमी होत नाही ना?

किती तरी दिवसात आरामात चहा पीत मी वर्तमानपत्र वाचले नाही पण अगदी सगळ्या बातम्या समजतात. विशेष म्हणजे लोकांच्या प्रतिक्रियांसहित. एकाच ठिकाणी ते म्हणजे फेसबुकवर! क्रिकेट आणि टेनिस चे स्कोअर्स कोणीतरी फ्रेंड फेसबुकवर पोस्ट केलेला असतो. सगळ्यात उत्तम गोष्ट म्हणजे सर्वांचे वाढदिवस, ऍनिव्हर्सरी आणि अन्य दिवसांचे आपल्याला फेसबुकवर alerts दिले जातात. त्यामुळे आपण फ्रेंडसना नक्कीच थोडा आनंद त्यांना शुभेच्छा देऊन देऊ शकतो. तसेच आपल्याला पण फ्रेंडसकडून शुभेच्छाचे पोस्ट मिळाल्या की आनंद होतोच ना? यापूर्वी आपला वाढदिवस किमान दहा-वीस लोकांना माहिती असायचा. आता सर्व फ्रेंडसना माहिती असतो फेसबुकमुळे. बिझिनेसना किती उपयोग झाला फेसबुकमुळे. आपल्या बिझिनेसची जाहिरात, प्रसिद्धी, त्याविषयी वेळोवेळी माहिती, सेल व डिस्काउन्ट्स विनामुल्य वेगवान पद्धतीने लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी उत्तम मार्ग आणि सोय फेसबुकने दिली आहे.

पूर्वी पब्लिक स्पीकिंगचे क्लासेस लोकप्रिय होते आणि आता पब्लिक सोशल एक्स्प्रेशनचे. पूर्वी लोकप्रिय पुस्तके म्हणजे "How To Win Friends and Influence People" किंवा "The 7 Habits of Highly Effective People" होते आणि आता लोकप्रिय पुस्तके होतील ती म्हणजे "How To Win Friends and Influence People on Social Media" किंवा "The 7 Habits of Highly Effective People on Social Media".

काही वर्षांपूर्वी कशी "डॉट कॉम"ची लाट आली होती तशी सोशल मिडियामुळे सध्या "बिग डॅटा"ची लाट आली आहे एवढी सर्व माहिती साठविण्यासाठी. माहिती तंत्रज्ञान, सॉफ्टवेअर, हार्डवेअर इ. विषयांमधे अत्यंत वेगवान प्रगती होत आहे.

मला आठविते माझ्या लग्नात माझ्या आईने रुचिरा नावाचे एक रेसिपी-बुक दिले होते. काळजीने की अमेरिकेत काही अडले तर एक रेफरन्स बुक म्हणून. पण रुचिरा बुकची पाने शोधून काढेपर्यंत फेसबुकवर प्रश्न पोस्ट केला की ग्रुपवरून उत्तर आलेले असते. उत्तर नक्कीच लवकर सापडते पण आईला एक प्रेमाचा फोन राहून जातो. याची मला खूप खंत वाटू लागली. म्हणून मी आईला एक प्रेमाचा फोन आधी करते आणि प्रश्न विचारुन फोनवरच त्याचे उत्तर मिळविते. कधी कधी फेसबुक न वापरल्याचा समाधान मिळतो. फेसबुकच्या माध्यमातून आपल्याला अगदी पाकक्रिया असो किंवा आयुर्वेद असो किंवा योगा..अगदी कुठल्याही प्रश्नाचे उत्तर इंस्ट्ंट मिळते. त्यामुळे माहितीची कोठे कमी नाही. पण फेसबुक संस्कार नक्कीच घडवू शकत नाही.

धर्माविषयी माहिती मिळेल पण धार्मिक बनवू शकणार नाही.

संस्कृतीविषयी माहिती मिळेल पण सुसंस्कृतपणा देऊ शकणार नाही.

देशाविषयी माहिती मिळेल पण देशभक्त बनवू शकणार नाही.

व्हॅलेन्टाईन्स डेचे मेसेज मिळतील पण प्रेमाची भावना मिळू शकणार नाही.

जगाशी कनेक्ट करुन देऊ शकेल पण नात्यातील गाठी जोडू शकणार नाही.


ग्रुप्स तयार करु शकेल पण आत्मीयता आणू शकणार नाही.

भरपुर फ्रेंड्स जोडून देऊ शकेल पण माणुसकी देऊ शकणार नाही.

चॅरिटी संस्थांविषयी माहिती देऊ शकेल पण दानत देऊ शकणार नाही.

माझ्या वडीलांचा मागच्यावर्षी भयंकर अपघात झाला. पायाला प्रचंड दुखापत झाली. हा काळ अत्यंत अवघड होता. दररोज चोवीस तास घरात काढणे हे अवघड होते . ते आज फेसबुकचे अत्यंत आभार मानतात. फेसबुकमुळे अगदी शाळेचे, कॉलेजचे, सैन्यातील त्यांच्या सर्व्हिस मधील, त्यांच्या कैलाश मानससरोवर यात्रेतील इ. मित्रांच्या भेटी फेसबुकवर झाल्या. ते मित्र दररोज गप्पा मारायला आणि त्यांना बरे वाटण्यास फोन करतात. आणि एवढेच नाही तर ते भेटून जातात. फेसबुकच्या माध्यमातून घर बसल्या सर्व लोकांशी संपर्क साधता आला. त्यांना लेखनाची आपली आवड फेसबुकच्या माध्यमातून जोपासता आली.

फेसबुकने आपल्याला मान वर करुन शिकविण्यापेक्षा सतत मान खाली करुन जगायला शिकविले आहे असेच म्हणावे लागेल कारण फेसबुक ॲप मोबाइल फोनवर आल्यापासून आपल्याला फेसबुकचे जणू व्यसनच लागले आहे. पण फेसबुकच्या या जगात फेसबुक प्रोफाईलमुळे नक्कीच आपल्याला उपयोग करता येऊ शकतो. फेसबुकने Logout चे बटण तर दिले आहे पण सर्व गोष्टी at fingertips आल्यामुळे ते बटण वापरणे अवघड झाले आहे. आज जसा सोशल सिक्युरिटी id किंवा आधार id अनिवार्य असतो तसे काही वर्षांनी फेसबुक id तर अनिवार्य होणार नाही? याला फेसबुकची किमया की माया म्हणायची हे ठरविणे आपल्या हातात नाही का?




--सौ. दिप्ती कुलकर्णी – देशमुख